ijindex

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

# अनुक्रमणिका


आंबेडकरवादी मराठी साहित्य नामांतर व नामविस्तार
**प्रा.डॉ.मधुकर गणेश मोकाशी** 151

आंबेडकरवादी कवितेतील 'नकार'
**प्रा.डॉ. बाबुराव बी. खंदारे** 153

लोकनाथ यशवंत यांची आंबेडकरवादी कविता (आता होऊन जाऊ द्या)
**डॉ. युवराज धबडगे** 157

आंबेडकरवादी मराठी कादंबरी
**प्रा.डॉ.जी.व्ही.शिंदे** 161

दलित साहित्याचे शब्दपरिवर्तन आंबेडकरवादी साहित्य
**डॉ. शत्रुघ्न जी जाधव** 164

वामनदादा कर्डक यांच्या निवडक आंबेडकरवादी कवितांचा आढावा
**डॉ. बाळासाहेब बी. लिहिणार** 167

'मिलिंद' मधील आंबेडकरवादी कवी : डॉ. यशवंत मनोहर
**डॉ. मिलिंद माणिकराव वाव्हळे** 170

नव्वदोत्तर आंबेडकरवादी कादंबरी
**डॉ. सारीपुत्र तुपेरे** 175

आंबेडकरवादी मराठी कादंबरी
**डॉ. शिवराज काचे** 180

'थांबा ! रामराज्य येतंय ! या नाटकातून व्यक्त झालेली आंबेडकरवादी जाणीव
**प्रा. डॉ. संगीता नारायणराव मुंढे** 183

आंबेडकरी जलसा स्वरूप आणि प्रेरणा
**प्रा. डॉ. मनोहर सिरसाट** 187

आंबेडकरवादी साहित्याचे मराठी साहित्यात योगदान
**प्रा. दत्ता रामचंद्र कांबळे** 190

अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील आंबेडकरी वि[illegible]
**प्रा.डॉ.दिलीप रामचंद्रराव जाधव** [illegible]

# आंबेडकरी जलसा स्वरूप आणि प्रेरणा

प्रा. डॉ. मनोहर सिरसाट

शाहिरी वाङ्मयात जलसा या प्रकाराचा समावेश होतो. 'जलसा' हा शब्द मराठीत गाण्याच्या बैठकीलाच म्हणण्यात येतो. परंतु या शब्दाचा मूळ अर्थ? सभा? मेळावा असा आहे. १

थोडक्यात जलसा हा नृत्य-नाटा-संगीतप्रधान असतो. त्यात उत्तान श्रृंगाराला पोषक अशी नटाने केलेली संवादनी असते. त्यातील संवाद खटकेबाज असतात. तमाशात वग असतो तसा वग जलशात नसतो. थोडक्यात जलसा या प्रकारात नृत्याला, नाटाला व संगीताला प्रधानस्थान असते. मराठी जलसा, नवीन शब्द तमाशात असून तो इस्लामी दरबारात किंवा मूळच्या रूपात कायम राहिला कसा. अर्थातच मूळचा ?जलसा? भांड, गोंधळी, महार या गायकांच्या उदरनिर्वाहाचे साधन बनला आहे.

महाराष्ट्रात मराठी भाषेच्या परिघामध्ये जे वाङ्मयप्रकार आणि कलाप्रकार अस्तित्वात आहेत, त्यात ?जलसा? या कलाप्रकाराला सांस्कृतिकदृष्टाा अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा वाङ्मयप्रकार लोकजीवनात लोकसंस्कृतीच्या, लोककलांच्या, परिप्रेक्ष्यातून विकसित होत गेला. त्यामुळे ?जलसा? या कलाप्रकाराचा उगम आणि विकास शोधताना भाषा, मराठी वाङ्मय आणि मराठी लोककलाप्रकारातून जी एक सांस्कृतिक धारा विकसित होत गेली त्यामध्ये ?जलसा? ह्या कलाप्रकाराच्या पाऊलखुणा शोधता येऊ शकतात. २?जलसा? या शब्दाची व्युत्पत्ती आणि व्याख्या

तलसा या संकल्पनेचा पारंपारिक, कोशगत अर्थ, जलसा शब्दाची व्याख्या याचा शोध घेताना जलसा हा शब्द तमाशा, शाहीर व शाहिरी या शब्दाप्रमाणेच अरबी भाषेतून आलेला दिसतो. त्याचा शब्दकोशगत अर्थ पुढीलप्रमाणे आहे :

१. जलसा - (पु.अ.) गाण्याची बजावण्याची बौठक, गाण्याची मौफल, संमेलन, अ साइनिंग पार्टी अ मजालास.
२. अर जलस - बसणे, जल्सा, पेकाम - जल्स.
३. जलसा - (पु.अ.) सभा, अधिवेशन, समारंभ, उत्सव, जलसा, मौफल, गाणे बजावणे.
४. जलसा - (पु.अ.) आनंद, उत्सव, सभा, समिती आदि का बडा अधिवेशन.
५. जल्स - (पु.अ.) १. सभा, अधिवेशन, बौठक २. उत्सव, समारंभ ३. जलसा, मौफल (नाचगाण्याची) गाह ४. स्त्री (अ. ३ फा.) (११) सभास्थान, मौफलीची जागा.

या सर्व व्युत्पत्ती आणि शब्दावरून असा निष्कर्ष काढता येतो की, जलसा म्हणजे गाणे बजावण्याची मौफल, सभा, संमेलन, अधिवेशन असाच अर्थ प्रतित होतो. आंबेडकरी जलशाच्या बाबतीत वसंत घोगरे यांनी अशी व्याख्या केली आहे की, ?जलसा म्हणजे सहजासहजी कुठेही केव्हाही सादर करता येईल असे फर्सिकल संगीत नाटक.? यातूनही संगीताचा जो उल्लेख येतो त्यातून गाणे बाजवण्याची मौफल असा अर्थ सूचित होतो. मात्र यातून जो निखळ रंजनाचा अर्थ प्रतित होतो, तो मात्र सत्यशोधकी व आंबेडकरी जलशाला लागू होत नाही.

गीत, संगीताचा समन्वय असलेले समाज प्रबोधानात्मक तमाशा असाच अर्थ संभावतो. अर्थ हे जरी असले तरी असा प्रश्न निर्माण होतो की, ?सत्यशोधक जलसा? किंवा नंतरच्या काळात त्याचे अनुकरण करणारा ?आंबेडकरी जलसा? यांना जलसा हे नाव पडले. जलसा या नामाभिधानाच्या आधी सत्यशोधकी तमाशा असेच म्हटले जाई, खरे तर जलसा हा शब्ददेखील ?तमाशा?, ?शाहीर?, ?शाहिरी? या शब्दाप्रमाणेच परकीय आहे. भारतीय भाषाकुळातील नाही. जलसा हा अरबी भाषतून आलेला शब्द असून त्याचे कोशागत अर्थ लक्षात घेता सत्यशोधकी किंवा आंबेडकरी जलसे म्हणजे केवळ गाणे बजावण्याची मौफल, बैठक, सभा, संमेलन, अधिवेशन किंवा उत्सव नाही. त्याच्या रचनेत संगीताला, गीताला महत्त्व आहे. पण ते अरबी भाषेतील जलसा या संकल्पनेत जे जस आहेत तसे नाही. सत्य शोधकी व आंबेडकरी जलशाच्या अंतरंगात संगीत आहे. पण ते लोकसंगीत आहे, पण लावणीत पोवाडादी लोकगीत आहे. जलशाचा ?संगीतबारी? असा अर्थ घेतला तरी त्यातून सूचित होणारे गीत, संगीत आणि नृत्यात्मक ही संगीतबारी किंवा निखळ रंजनात्मक संगीत जलशासारखी मांडणी सत्यशोधकी वा आंबेडकरी जलशात नसते.

**आंबेडकरी जलसा :**

जलसा या वाङ्मयप्रकाराच्या व्युत्पत्तीचा सविस्तर विचार यापूर्वी केला असून जलसा म्हणजे गाणे बजावण्याची बौठक, मौफल, सभा, संमेलन असा अर्थ अभ्यासकांनी दिल्याची नोंद केली आहे. उपरोक्त व्युत्पत्तीना अनुसरून जलसा या कलाप्रकाराचे अस्तित्व संगीत जलशाच्या नंतर सत्यशोधक जलशाच्या स्वरूपात उदयास आले. सत्यशोधकी जलशाचीच एक विकसित अवस्था आंबेडकरी जलशाच्या रूपाने १९३० नंतर कार्यान्वित झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, उच्चार, आदेश, संदेश, तत्त्वज्ञान आणि त्यांनी सुरू केलेली दलित मुक्ती चळवळ यांना केंद्रस्थानी मानून आंबेडकरी जलसा उदयास आले. या जलशानी समाजप्रबोधन, समाजसंघटन आणि समाजोन्नतीसाठी फार मोठे योगदान दिले.

**आंबेडकरी जलसे - प्रेरणा**

महात्मा फुल्यांचे कार्य आणि सत्यशोधक चळवळीचे तत्त्वज्ञान ही जशी सत्यशोधक कलावंतांच्या कीर्तने,मेळे, शाहिरी आणि सत्यशोधक जलशांमागे प्रेरणा ठरते.त्याचप्रमाणे आंबेडकरी कलावंताच्या समग्र कलाविष्कारामागे जलसे, शाहिरी, भजनी मंडळ, गायनपार्टी, कलापथके, कव्वालपार्टी, दलित रंगभूमी, चव्हाटानाटा आणि एकूणच आंबेडकरी साहित्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि कर्तृत्व, व्यक्तित्व, तत्त्वज्ञान आणि चळवळीच्या प्रेरणा दिसतात.४

काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या वेळी आंबेडकरांनी अस्पृश्य तरूणाला सामाजिक कार्याला वाहून घेण्याचे आवाहन केले होते. त्यावेळी भीमराव कर्डकांनी २६ ऑक्टोबर १९३० ला ?नाशिक जिल्हा युवक संघ? या नावाचा संघ स्थापन केला. त्या संघामार्फत आंबेडकरांच्या चळवळीचा व विचारांचा संपूर्ण जिल्हाभर प्रसार आणि प्रचार केला. बाबासाहेबांचे विचार, त्यांच्या चळवळी आणि मुक्तिलढ्यातील स्थितिगती आणि प्रगती तळागाळातील अस्पृश्य लोकांना कळावी म्हणून कर्डकांदी जलसाकारांचे आंबेडकरी जलसे उदयास आले असे दिसते.

१९३० च्या आधी दलित समाजातील शाहीर, कवी पारंपरिक तमाशा रंगभूमीत, तर काही सत्यशोधकी जलशात काम करीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा, चळवळीचा, सत्याग्रहादी आंदोलनाचा प्रभाव १९३० नंतर खूपच वाढलेला दिसतो. त्यातून संवेदनशील दलित कलावंत जे पारंपारिक तमाशात होते ते तमाशा सोडून आंबेडकरी जलशांकडे वळले. जे सत्यशोधकी जलशात होते त्यांनीही आपल्या जलशांचा आत्माशय पूर्णपणे आंबेडकरी केला असे दिसते.५ अशा प्रकारे आंबेडकरी जलशाची सुरूवात झालेली दिसते.

दलित शाहिरी अर्थात आंबेडकरी शाहिरी

दलित शाहिरी समजवून घेण्याआगोदर ?दलित? ह्या शब्दाचा शब्दशः अर्थ काय, हे पाहणे योग्य ठरेल. ह्या शब्दाची दळण-दलित-दलित अशी एक व्युत्पत्ती सांगितली जाते. दळले गेलेले-जात असलेले ते दळित व ह्यापासूनच ?दलित? हा शब्द तयार झाला असावा असा एक तर्क केला जातो. दळण्यासाठी जाते पूर्वीपासून वापरले जाते. ?जात्यातले रडतात, सुपातले हसतात?, ?आंधळे दळते, कुत्रे पीठ खाते?, ह्या विविध लोकोक्तीवरून जात्याचे मराठी समाजजीवनातील स्थान स्पष्ट होते. चातुर्वर्ण्यव्यवस्था हे जाते असून त्या जात्यात जे भरडले-चिरडले-दळले गेले व काही प्रमाणात आजही जात आहेत, ते सर्व दळित म्हणजेच दलित, अशी ह्या पाठीमागे कल्पना आहे व ती एकूण दलित समाजाची वाटचाल पाहता यथार्थ वाटते.६

दलित शब्दाचा अर्थ जातिवाचक घेऊन केवळ अस्पृश्यांच्या सामाजिक शोषणाचा विचार करण्याऐवजी जे जे शोषित ते ते सर्व दलित असा विस्तृत व व्यापक अर्थ आज समीक्षकांना मान्य झाल्याचे दिसते. त्यामुळे दलित शब्दाच्या परिभाषेत सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय अशा कुठल्याही प्रकारे ज्यांचे ज्यांचे शोषण करण्यात आले व जो जो शोषित-उपेक्षित-दरिद्री-बहिष्कृत जीवन जगणारे आहेत, अशा सर्व प्रकारे तळागाळात रुतून बसलेल्या माणसाला दलित म्हणूनच गणले गेले. नाटककार प्रेमानंद गज्वी ?दलित? या शब्दाची व्याख्या जातिवाचक मानत नाहीत, तर ?जे जे कुणी शोषित आहेत, त्यामध्ये स्त्रियाही आल्या. ते सर्व दलितच आहेत.?

संदर्भ ग्रंथ सूची :


१) डॉ. ठाकूर भगवान - आंबेडकरी जलसे - सुगावा प्रकाशन, पुणे प्र.आ. २००५, पृ. ३२.
२) तत्रैव - पृ.३५.
३) तत्रैव - पृ. १०१
४) परांजपे अशोक - नवशक्ती सुवर्ण महोत्सव अंक १९८७ पृ.३०
५) तत्रैव - पृ.३०.
६) डॉ. नंदपुरे - दलित नाटक आणि रंगभूमी पिंपळापूरे ॲड. कं. पब्लीशर्स, नागपूर पृ.५६.
७) गायकवाड महेंद्र - दलित शाहिरी, संकेत प्रकाशन, नागपूर, पृ.२.



## प्रा. डॉ. मनोहर सिरसाट

सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक आणि विभाग प्रमुख,पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.